


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ४१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२४ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## SIR वरून विरोधकांच्या आरोपांना भाजपचं प्रत्युत्तर, संबित पात्रा म्हणाले...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नवी दिल्ली :** विशेष सखोल पुनरीक्षणाला घेऊन निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरून सध्या राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरु आहे. आता भाजपचे प्रवक्ते संबित पत्रा यांनी निवडणूक आयोगाच्या कथित असहमती अहवालावरून विरोधी पक्षांवर जोरदार हल्ला चढवला आहे. जनतेने नाकारल्यानंतर आता विरोधक निवडणूक आयोगाला लक्ष्य करत असल्याचा आरोप केला आहे. निवडणूक आयोगातील दोन आयुक्तांनी विशेष सखोल पुनरिक्षणाला (SIR) शी संबंधित काही निर्णयांवर आक्षेप नोंदवल्याच्या वृत्तानंतर विरोधकांकडून आयोगावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर भाजपचे प्रवक्ता संबित पात्रा यांनी विरोधकांवर पलटवार केला आहे.



**नेमकं प्रकरण काय आहे?**

एका वृत्तानुसार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी गेल्या १० महिन्यात (SIR) वर किमान १४ वेळा आक्षेप नोंदवले होते. काही आक्षेप त्याच दिवशी दाखल करण्यात आले होते आणि काही निर्णय त्यांच्या माहितीशिवाय घेण्यात आल्याचे वृत्त आहे. दोन्ही आयुक्तांनी अनेक राज्यांमध्ये यादी पुनरीक्षणादरम्यान मतदार डेटाबेसची वागलणी आणि व्यवस्थापन यासारखे मुद्दे उपस्थित केले होते. मात्र देशभरातील (SIR) संबंधित संपूर्ण निवडणूक आयोग एकमताने होता. SIR सह आयोगाचे सर्व प्रमुख निर्णय दोन्ही निवडणूक आयुक्त आणि मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने एकमताने घेण्यात आले.

यावरून विरोधी पक्ष SIRवर टीका करत आहेत. त्यांचा आरोप असा आहे की, भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांसोबत नसलेल्या मतदारांना लक्ष्य करणे हा याचा उद्देश आहे. मात्र भाजपने हे आरोप फेटाळून लावले आहे. निवडणूक आयोग जनतेचा विश्वास जिंकण्यात अपयशी ठरल्यामुळे विरोधी पक्ष त्याला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहे, असे भाजपने म्हटले आहे.

**भाजप प्रवक्ते संबित पात्रा काय म्हणाले?**

भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी विरोधी पक्षावर जोरदार हल्ला चढवला आहे. ते म्हणाले, २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यापासून जनतेने व्रिओढी पक्षांना वारंवार नाकारले आहे. ज्यावेळी काँग्रेसच्या लक्षात आले की ते भारतीयांचे मने जिंकू शकत नाही, त्यावेळी घटनात्मक संस्थांवर हल्ला करण्यास सुरवात केली. पात्रा यांच्या मते, विरोधी पक्ष निवडणूक आयोगावर सातत्याने हल्ला करत होता. मात्र आता आयोगाने सविस्तर नोट जरी केली आहे. त्यातून सत्य उघड केले आहे. यानोटवरून असे दिसून येत आहे की, सर्व निवडणूक आयुक्तांमध्ये अधिकृत चर्चा झाली होती. चर्चेनंतर सर्व आयुक्त एकमताने निर्णयांवर पोहोचेल. पात्रा म्हणाले की, हेच लोकशाही प्रक्रियेचे सौंदर्य आहे. मतांतर असू शकतात, चर्चा देखील होऊ शकतात मात्र अखेरीस संस्था एकमताने निर्णय घेते.

## लासलगाव बाजार समितीत नवीन सोयाबीनची आवक सुरू मुहूर्तावर ६,०५१ रुपयांपर्यंत भाव




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२३, विंचूर (नाशिक) :** लासलगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारावर यंदाच्या हंगामातील नवीन सोयाबीनची आवक सुरू झाली असून मुहूर्ताच्या लिलावात सोयाबीनला कमाल ६,०५१ रुपये प्रति क्विंटलपर्यंत दर मिळाला असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर जगताप यांनी दिली.

नाशिक जिल्ह्यातील निफाड, चांदवड, येवला, सिन्नर, सटाणा, देवळा, कळवण, मालेगाव यासह शेजारच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव व राहुरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची लागवड केली आहे. शेतकऱ्यांना म ाल विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून लासलगाव बाजार समितीने सर्व प्रकारच्या भुसार व तेलबिया शेतीमालाचे नियमन केले आहे. त्यानुसार लासलगाव मुख्य बाजार, निफाड व विंचूर उपबाजार आवारांसह मानोरी खुर्द येथील तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रावर लिलाव सुरू करण्यात आले आहेत.

मंगळवारी (दि.२२) लासलगाव मुख्य आवारावर उपस्थित व्यापाऱ्यांच्या हस्ते नवीन सोयाबीनचे विधिवत पूजन करून लिलाव सुरू झाले. मुहूर्तावर पिंपळगाव लेप (ता. येवला) येथील शेतकरी ज्ञानेश्वर सुकदेव रेंढे यांच्या सोयाबीनला 'श्लोक मार्केटिंग इंडिया'ने सर्वाधिक ६,०५१ रुपये प्रति क्विंटल असा विक्रमी भाव दिला.

तसेच सोमठाणे (ता. चांदवड) येथील शेतकरी दगडू इमाम फकीर यांच्या सोयाबीनला ५,९०१ रुपये आणि सावरगाव (ता. येवला) येथील शेतकरी समाधान वाल्मिक काकड यांच्या सोयाबीनला ५,८६९ रुपये प्रति क्विंटल असा दर मिळाला. हा माल 'श्री स्वामी समर्थ एंटरप्रायजेस'ने खरेदी केला.

या लिलाव प्रसंगी तेलबिया व्यापारी सागर थोरात, कपिल कापडी, सागर ब्रम्हेचा, सुरेश लुटे यांच्यासह बाजार समितीचे लिलाव प्रमुख काकासाहेब जगताप, प्रभारी गोविंद कवडे, हिरालाल सोनारे, दत्तात्रय घोडे, आकाश शेजवळ आणि परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रताप सरनाईक फाउंडेशन आणि जी.एम. नवरात्रोत्सवाची रणधुमाळी

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२३, मिरा-भाईंदर :** उत्सवांची परंपरा, संस्कृतीचा वारसा आणि लोकसेवेचे व्रत अंगिकारलेल्या मि रा-भाईंदर नगरीत यंदा पुन्हा एकदा गरब्याचा भव्य-दिव्य रंग उधळणार आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली, 'प्रताप सरनाईक फाउंडेशन' आणि 'जीएम नवरात्रोत्सव' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नवरात्री महोत्सव २०२६ चा नारळ आज अत्यंत दिम ाखात फुटला. मिरा रोड (पूर्व) येथील बेवर्ली पार्क, आर.बी.के. शाळेजवळ असलेल्या नामदार गोखले मैदानावर युवसेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या शुभहस्ते शास्त्रोक्त पद्धतीने भूमिपूजन करून महोत्सवाचा श्रीगणेश करण्यात आला.

मागील वर्षीच्या नवरात्रोत्सवात मंत्री प्रताप सरनाईक यांनी मिरा-भाईंदरच्या गरबाप्रेमींना अधिक मोठ्या आणि प्रशस्त मैदानात गरबा खेळू देण्याचा शब्द दिला होता. तो शब्द सत्यसृष्टीत उतरवत यंदा हे भव्य गोखले मैदान नवरात्रोत्सव काळात सर्व गरबा रसिकांसाठी खुले करण्यात येणार आहे.



### भव्य नामदार गोखले मैदानावर घुमणार गरब्याचा नाद!

रविवार, ११ ऑक्टोबर ते सोमवार, १९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत हा नऊ दिवसांचा नयनरम्य उत्सव रंगणार आहे. एकाच वेळी तब्बल २५,००० हून अधिक गरबा प्रेमी या विशाल मैदानावर थिरकू शकतील, अशी अभूतपूर्व व्यवस्था करण्यात आली आहे. याच पावन भूमीवर चैत्र नवरात्रोत्सव साजरा होतो. कदाचित भगवती जगदंबेचीही हीच इच्छा असावी की, याच विशाल अंगणात तिच्या भक्तांनी शक्तीची उपासना आणि गरब्याचा जल्लोष करावा.

महाराष्ट्राच्या उत्तुंग सांस्कृतिक परंपरेचे जतन करणे आणि मिरा-भाईंदरमधील सर्वसामान्य नागरिकांना, तरुणाईला कोणत्याही मोबदल्याशिवाय एक हक्काचे, सुरक्षित आणि भव्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे हाच या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. शहराच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या हजारो गरबाप्रेमींसाठी ही नवरात्रोत्सव म्हणजे एक अभूतपूर्व पर्वणीच ठरणार आहे.

आज भूमिपूजनाच्या निमित्ताने त्या ईश्वरी इच्छेची आणि मिरा-भाईंदरकरांच्या स्वप्नाची पूर्तता होत आहे, अशा शब्दांत युवसेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी आपल्या भावनांना वाट करून दिली. निवडणुकीतील हार-जीत किंवा राजकीय समीकरणांपेक्षा जनतेशी असलेलं रक्ताचं नातं सर्वात वरचढ असतं, हा विचार अधोरेखित करताना पूर्वेश सरनाईक पुढे म्हणाले कि, शिवसेना ही केवळ राजकारणासाठी नसून ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या बाळासाहेबांच्या विचारांवर चालणारी संघटना आहे. निवडणुका येतात आणि जातात, पण मिरा-भाईंदरच्या जनतेचा आनंद आणि शहरातील संस्कृती जपण्याचं आमचं व्रत कधीही थांबणार नाही. सरनाईक कुटुंब हे शहराच्या मनोरंजनासाठी आणि सांस्कृतिक अस्मितेसाठी सदैव कटिबद्ध होते, आहे आणि राहील.

भूमिपूजनाच्या या सोहळ्याला शिवसेना पक्षाचे स्थानिक पदाधिकारी, महिला वर्ग आणि अनेक कार्यकर्त्यांची उत्साही उपस्थिती लाभली होती. यंदाचा जीएम नवरात्रोत्सव मिरा-भाईंदरच्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट आणि अविस्मरणीय उत्सव ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## भानेगाव कोळसा खान परिसरात बिबट्याचे पुन्हा दर्शन

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.२३, नागपूर :** मागील दोन तीन महिन्यापासून भानेगाव व बिना(संगम) परिसरात बिबट्याचा वावर आहे. भानेगाव ओपन कोळसा खान बँकरच्या मागील भागात २२ सप्टेंबर मंगळवारला सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास बिबट्या आढळून आल्यामूळे प्रचंड दहशत निर्माण झाली आहे. मात्र, वनविभाग प्रशासनाचे हेतुपुरस्सर दुर्लक्ष दिसून येत आहे.

कोळसा खाणीतून कोराडी व खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात लागणारा कोळसा आणण्यासाठी कन्व्हेअर कोल पाईप वे प्रकल्प कार्यरत आहे. कन्व्हेअर कोल पाईप वे प्रकल्पाची देखभाल करणाऱ्या कर्मचाऱ्यांना २२ सप्टेंबर मंगळवारला सायंकाळी ५.३० च्या दरम्यान बिबट्या दिसून आला. यावेळी कर्मचाऱ्यांनी मोबाईल मध्ये व्हिडीओ तयार केला.

मागील एका आठवड्यात बिना(संगम) परिसरात बिबट्याची दहशत असून अनेक पशुधनाची बिबट्याने शिकार केली आहे. वनविभाग प्रशासनाने बिबट्याला जेरबंद करण्यासाठी दोन पिंजरे लावले आहेत मात्र अपयश आले आहे.

वनविभाग प्रशासन फक्त पिंजरे लावून मोकळे झाले, मुळात हायटेक यंत्रणा व पेट्रोलिंग अपेक्षित आहे. मात्र दुर्दैव वनविभाग प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे.

## अमली पदार्थ विरोधी पथकाची धडक कारवाई; हेरॉईन पुरवठा नेटवर्कचा पर्दाफाश

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२३, पनवेल (नवी मुंबई) :** नवी मुंबई शहरात अम ली पदार्थांची विक्री व पुरवठा करणाऱ्या नेटवर्कविरोधात नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने (अपींळ-छरॲलेंीळली णपळीं) धडक कारवाई केली आहे. या कारवाईत हेरॉईनच्या आंतरजिल्हा पुरवठ्याशी संबंधित असल्याचा संशय असलेल्या चार जणांना पोलिसांनी अटक केली आहे. कामोठे परिसरात करण्यात आलेल्या प्राथमिक कारवाईत पोलिसांनी सुमारे १ लाख ३० हजार रुपये किमतीचे ६.५ ग्रॅम हेरॉईन जप्त केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमली पदार्थांच्या विक्री आणि पुरवठ्याबाबत मिळालेल्या माहितीच्या आधारे अमली पदार्थ विरोधी पथकाने कामोठे परिसरात कारवाई केली. या कारवाईदरम्यान एका संशयिताकडून हेरॉईन जप्त करण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी संबंधित व्यक्तीची चौकशी करून या अमली पदार्थाच्या पुरवठ्याच्या साखळीबाबत माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. चौकशीदरम्यान मिळालेल्या माहितीनुसार




पोलिसांनी तपासाची दिशा पुढे नेत खारघर, बोरीवली, शीव-कोळीवाडा आणि कळंबोली या परिसरांपर्यंत तपासाचा विस्तार केला. या तपासातून अमली पदार्थांच्या पुरवठ्याशी संबंधित आणखी तीन संशयित व्यक्तींना पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली.

या कारवाईमुळे नवी मुंबईत हेरॉईनचा पुरवठा करणाऱ्या नेटवर्कचा काही भाग पोलिसांच्या हाती लागल्याचे समोर आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींचा एकमेकांशी नेमका काय संबंध आहे, हेरॉईनचा पुरवठा कुठून होत होता, त्याचा मुख्य सूत्रधार कोण आहे आणि या नेटवर्कमध्ये आणखी किती जण सहभागी आहेत, याचा तपास सध्या पोलिसांकडून सुरू आहे.

दरम्यान, जप्त करण्यात आलेल्या हेरॉईनचा स्रोत, त्याची विक्री कोणत्या भागात केली जात होती तसेच या अमली पदार्थांच्या व्यवहारातून कोणकोणते आर्थिक व्यवहार झाले आहेत, याबाबतही पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. आरोपींकडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे या नेटवर्कमधील अन्य व्यक्तींपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न पोलिसांकडून केला जात आहे. अटक करण्यात आलेल्या चारही आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. पुढील तपास नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाकडून सुरू आहे.

अमली पदार्थांच्या वाढत्या व्यवहारांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून विविध भागांत गुप्त माहितीच्या आधारे कारवाई केली जात आहे. या प्रकरणातील पुढील तपासात हेरॉईन पुरवठा करणाऱ्या संपूर्ण साखळीचा उलगडा होतो का, तसेच या नेटवर्कमागील मुख्य सूत्रधारापर्यंत पोलीस पोहोचतात का, याकडे लक्ष लागले आहे.

## महातपुरीत मुदतपूर्व पीक कापणी प्रयोगात शून्य उत्पादन

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२३, गंगाखेड (परभणी) :** परभणी जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी गंगाखेड तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन शेतातील पिकांची पाहणी केली. जिल्हाधिकारी चव्हाण यांनी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून पिकांची सद्यस्थिती जाणून घेतली.

महातपुरी येथे गट क्रमांक २९५ मधील शेतकरी राम केरबा मुलगीर यांच्या शेतावर मुदतपूर्व पीक कापणी प्रयोगाचे नियोजन करण्यात आले. यावेळी करण्यात आलेल्या पीक कापणी प्रयोगात शून्य उत्पादनाचा पंचनामा करण्यात आला. पावसाअभावी आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे यावेळी निदर्शनास आले. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्यासह उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर,तहसीलदार गंगाखेड उषाकीरण शृंगारे जिल्हा कृषी अधिकारी परभणी, तालुका कृषी अधिकारी गंगाखेड, गटविकास अधिकारी गंगाखेड तसेच महसूल, कृषी व इतर विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. पीक कापणी प्रयोगाच्या वेळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी महातपुरी, माखणी, शिरसम आणि जवळा परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पिकांची पाहणी केली. दुष्काळग्रस्त परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेत पीक कापणी प्रयोगही घेण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष पाहणीमुळे शेतकऱ्यांच्या नुकसानीची वस्तुस्थिती प्रशासनाच्या निदर्शनास आली आहे.

# संपादकीय



## उदंड झाले भोंदू!

राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या भोंदू अशोक खरात प्रकरणाला गेल्या आठवड्यात बरोबर सहा महिने पूर्ण झाले आहेत. या सहा महिन्यांत पोलिसांनी राज्यात शंभरहून अधिक भोंदूंविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. यात बहुतांश प्रकरणांत महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात भोंदूंचे पेव फुटल्याबाबत राज्यभर चर्चा सुरू आहे. महाराष्ट्राला चिंतेत टाकणारी व विचार करायला लावणारी ही गंभीर बाब आहे. पुरोगामी महाराष्ट्रात या काळातील भोंदूगिरीचे भयावह वास्तव महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीमुळे समोर आले आहे.

भोंदू खरात प्रकरणानंतर महाराष्ट्र अंनिसने राज्यभर बुवाबाजी संघर्ष परिषदांचे आयोजन केले होते. त्यामुळे शोषक भोंदूगिरीविरोधात चर्चा होऊन पीडितांना पाठबळ मिळाले. काही ठिकाणी उत्स्फूर्तपणे, तर काही ठिकाणी महाराष्ट्र अंनिसच्या प्रयत्नाने शंभरावर गुन्हे दाखल झाले आहेत. ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत, त्या यादीवरून असे लक्षात येते की, बहुतांश सर्वच धर्मांतील भोंदूंविरोधात गुन्हे दाखल झाले आहेत. दाखल झालेल्या १०० गुन्ह्यांपैकी १७ गुन्हे मुस्लिम धर्मांतील, तर चार गुन्हे ख्रिश्चन भोंदूंविरोधात दाखल झाले आहेत. हे त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणाच्या तुलनेत अधिक आहे. ही धर्माधारित आकडेवारी सांगण्याचे कारण म्हणजे जादूटोणाविरोधी कायदा व अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम केवळ हिंदू धर्माच्या विरोधात आहे, असा गैरप्रचार केला जात आहे. या आरोपाला पुन्हा एकदा कृतिशील उत्तर मिळाले आहे.

भोंदूंनी ग्रामीण भागासह शहरी भागातील महिला व पुरुषांची फसवणूक केल्याचे या घटनांवरून उघड झाले आहे. विशेषतः यात महिलांवरील शारीरिक शोषणासह आर्थिक लुटीचे प्रमाण अधिक आहे. करणी-भानामती काढतो, अंगात आलेले भूत उतरवतो, अघोरी पूजा करतो, कौटुंबिक समस्या, आर्थिक अडचणी, आजारपण यातून बाहेर काढतो, पैशांचा पाऊस पाडतो इत्यादी कारणांसाठी भोंदूंनी भक्तांची फसवणूक केली आहे. भीतीपोटी व सामाजिक प्रतिष्ठेपोटी अनेक पीडित समोर येण्यास घाबरत होते. खरात प्रकरणानंतर पीडित महिलांमध्ये लढण्याची हिंमत निर्माण झाली आहे, त्यांच्यात न्यायाची अपेक्षा निर्माण झाली आहे. त्यामुळे या महिलांनी पुढे येण्याचे धाडस दाखवून एवढे गुन्हे दाखल होऊ शकले. प्रत्यक्षात राज्यातील पीडितांची संख्या याहून किती तरी पट अधिक असण्याची शक्यता आहे. इतरही पीडितांनी निर्भयपणे पुढे येण्याची गरज निर्माण झाली आहे.

एखाद्याला धार्मिक श्रद्धा ठेवायची असेल, तर ती त्याची वैयक्तिक बाब आहे. राज्य घटनेने प्रत्येक व्यक्तीला श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य दिले आहे. त्याला कुणी विरोध करण्याचे कारण नाही, मात्र वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे हे राज्य घटनेने आपले कर्तव्य सांगितले आहे. या कर्तव्याचा अंगीकार केल्यास श्रद्धा व अंधश्रद्धा यांतील फरक अधिक स्पष्ट होतो. श्रद्धेच्या नावाखाली दुसऱ्याला फसवणे, शारीरिक किंवा मानसिक छळ करणे, उपचारांपासून दूर ठेवणे किंवा अमानुष कृत्य करणे, हे स्वीकारता येणार नाही.

मात्र, या देशाचा आणि विशेषतः महाराष्ट्राचा उणेपणा असा, की आजही भोंदूगिरी थांबायचे नाव घ्यायला तयार नाही. विज्ञानाने माणसाला आकाशात झेप घेण्याची ताकद दिली, संगणकाने जग हातात आणले आणि वैद्यकीय क्षेत्राने असाध्य वाटणाऱ्या आजारांवर उपचार शोधले. पण याच आधुनिक काळात माणूस अजूनही भूताखेतांच्या भीतीने थरथरतो, अंगारे-धुपारे करतो, बुवा-बाबांच्या दारात माथा टेकतो आणि चमत्कारांच्या नावाखाली आपली बुद्धी गहाण ठेवतो, ही शोकांतिका आहे.

पीडित व्यक्ती स्वतःहून भोंदूकडे जातात, याबद्दल अनेकांना संताप येतो. हा त्यांचा मूर्खपणा वाटतो. परंतु डॉ. नरेंद्र दाभोलकर असे म्हणायचे, की अंधश्रद्धा निमूलन करताना क्रोधापेक्षा करुणेची आणि उपहासापेक्षा आपुलकीची जास्त गरज आहे. तेच विचार मनात ठेवून पीडितांना मानसिक आधार देण्याची गरज आहे. खरा प्रश्न हा समजून घेण्याचा आहे की, अशा व्यक्ती भोंदूकडे जाऊन कशा फसविल्या जातात? मानसशास्त्राच्या दृष्टीने पाहिले, तर भीती ही मानवी मनावर सर्वाधिक प्रभाव टाकणारी भावना आहे. ही भीती अनेक प्रकारची असते. कौटुंबिक कलह, वैवाहिक तणाव, आर्थिक अडचण, भविष्याची चिंता, आरोग्याच्या समस्या, मोहाची इच्छा व इतर बाबींमुळे व्यक्तीच्या जीवनात भीती तयार होते. त्यामुळे काही जणांची त्याबद्दलची तर्कशक्ती व विवेकबुद्धी हरवून बसते. ती व्यक्ती तत्काळ उपाय शोधत असते.

**- कृष्णा चांदगुडे**

# महाराष्ट्राच्या पर्यटन नकाशावरील अनोखं आकर्षण !!

## कास बहरलं!

### निसर्गाने सजवलेलं रंगीबेरंगी पुष्पवैभव !!




पावसाळ्याची चाहूल ओसरू लागते आणि सह्याद्रीच्या कुशीत निसर्गाचा एक अद्भुत सोहळा सुरू होतो. हिरव्यागार डोंगररांगांमध्ये अचानक रंगांची उधळण दिसू लागते. कुठे पांढऱ्या फुलांची चादर, कुठे पिवळा रंग, तर कुठे जांभळ्या-गुलाबी फुलांचे मनोहारी गालिचे हे दृश्य पाहताना निसर्गाने स्वतःच एखादं चित्र रेखाटलं आहे, असा भास होतो. हेच ते कास पठार!

सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात, सह्याद्रीच्या उंच पर्वतरांगांमध्ये वसलेलं कास पठार म्हणजे महाराष्ट्राला लाभलेलं निसर्गाचं अनमोल वैभव. पावसाळ्यानंतर साधारणपणे सप्टेंबर-ऑक्टोबरच्या आसपास येथे विविध रानफुलांचा बहर सुरू होतो आणि काही आठवड्यांसाठी हे पठार जणू फुलांच्या रंगमहोत्सवात न्हाऊन निघतं.

**फुलांचा हा बहर एवढा वैशिष्ट्यपूर्ण का?**

कास पठाराची भौगोलिक रचना, उंची, पावसाचे प्रमाण, येथील माती आणि विशिष्ट हवामान यामुळे येथे अनेक प्रकारच्या स्थानिक वनस्पती आढळतात. त्यातील अनेक वनस्पतींचा फुलण्याचा कालावधी अत्यंत मर्यादित असतो.

पावसाळ्यात पठारावर पाणी साचून वनस्पतींची वाढ सुरू होते. पावसाचा जोर कमी झाल्यानंतर वातावरणातील बदल, सूर्यप्रकाश आणि जमिनीतील ओलावा यांचा परिणाम म्हणून विविध वनस्पती एकामागून एक फुलू लागतात. त्यामुळे कासचा बहर हा केवळ फुलांचा उत्सव नसून निसर्गातील ऋतुचक्र आणि जैवविविधतेचा जिवंत आविष्कार आहे.

विशेष म्हणजे सर्व फुले एकाच वेळी उमलत नाहीत. वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळ्या वनस्पती फुलत असल्याने कास पठाराचे रूप काही दिवसांनी पुन्हा बदलताना दिसते. त्यामुळे दरवर्षी कासला भेट देणाऱ्या पर्यटकांनाही प्रत्येक वेळी काहीतरी नवीन पाहायला मिळतं.

**महाराष्ट्रभरातून पर्यटकांची गर्दी**

कासच्या फुलांचा बहर सुरू झाला की सातारा, पुणे, मुंबई, कोल्हापूर, सांगली, नाशिक यांसह महाराष्ट्राच्या विविध भागांतून निसर्गप्रेमी, छायाचित्रकार, विद्यार्थी आणि पर्यटक कासच्या दिशेने निघतात.

मोठ्या शहरांच्या धावपळीपासून काही काळ दूर जाऊन निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवण्याची संधी कास देते. फुलांनी सजलेले पठार, धुक्याने वेढलेल्या सह्याद्रीच्या रांगा, स्वच्छ हवा आणि सभोवतालची शांतता यामुळे कासचा अनुभव हा केवळ पर्यटनाचा राहत नाही; तो निसर्गाशी संवाद साधण्याचा अनुभव ठरतो.

विशेषतः छायाचित्रकारांसाठी कास म्हणजे एक खुलं नैसर्गिक स्टुडिओच. मात्र या सौंदर्याचा खरा आनंद घेताना पर्यटकांनी निसर्गाच्या मर्यादा ओळखणे तितकेच महत्त्वाचे आहे.

**युनेस्कोच्या वारशामुळे वाढलेले महत्त्व**

कास पठाराला जैवविविधतेच्या दृष्टीने असलेले महत्त्व आंतरराष्ट्रीय पातळीवरही अधोरेखित झाले आहे.यामुळे परदेशी पर्यटकही याकडे आकर्षित झाल्याचे पाहायला मिळत आहे.पश्चिम घाटाच्या जागतिक नैसर्गिक वारसा क्षेत्राचा भाग म्हणून कासचे महत्त्व आणखी वाढले आहे.

या परिसरात आढळणाऱ्या स्थानिक वनस्पती, त्यांचे अल्पकालीन जीवनचक्र आणि पश्चिम घाटातील वैशिष्ट्यपूर्ण परिसंस्था यामुळे कास हा केवळ पर्यटनस्थळ नसून अभ्यासक आणि पर्यावरणप्रेमींसाठी महत्त्वाची नैसर्गिक प्रयोगशाळा आहे.

**सौंदर्य पाहताना संवर्धनाची जाणीवही हवी**

कासचा बहर पाहण्यासाठी दरवर्षी हजारो पर्यटक येतात. मात्र पर्यटकांची वाढती संख्या ही या नाजूक परिसंस्थेसाठी आव्हानही ठरू शकते.

फुलांमध्ये जाणे, फुले तोडणे, वनस्पतींवर पाय ठेवणे, प्लास्टिक किंवा कचरा टाकणे, मोठ्या आवाजात संगीत वाजवणे अशा कृतींमुळे या नैसर्गिक अधिवासाचे नुकसान होऊ शकते. एखादं फूल तोडताना क्षणिक आनंद मिळेल; पण त्या फुलामागील संपूर्ण जीवनचक्र आणि पुढील पिढीसाठी त्याचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते.

म्हणूनच 'कास पाहायचं, पण कास जपून!' हा संदेश प्रत्येक पर्यटकाने मनात ठेवण्याची गरज आहे.

**पर्यटन आणि पर्यावरण यांचा समतोल**

कासच्या माध्यमातून सातारा जिल्ह्याच्या पर्यटनाला मोठी चालना मिळते. स्थानिक पातळीवर वाहतूक, निवास, भोजन, मार्गदर्शक आणि इतर पर्यटनपूरक व्यवसायांना त्याचा फायदा होतो. त्यामुळे कासचा पर्यटन विकास हा स्थानिक अर्थव्यवस्थेसाठीही महत्त्वाचा आहे.

मात्र पर्यटनाचा विस्तार करताना निसर्गाची वहनक्षमता लक्षात घेणे आवश्यक आहे. नियंत्रित पर्यटक संख्या, योग्य पार्किंग व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक सुविधा, मार्गदर्शित पर्यटन आणि पर्यटकांमध्ये जनजागृती या उपाययोजनांना अधिक महत्त्व दिले पाहिजे.

**कास म्हणजे फक्त फुले नव्हेत**

कासला भेट देताना फुलांचे फोटो काढणे हा अनुभवाचा एक भाग आहे; पण कासचा खरा परिचय त्याच्या संपूर्ण परिसंस्थेत दडलेला आहे. येथे उमलणारे प्रत्येक फूल, त्यावर येणारे कीटक, पावसाचे पाणी, पठाराची माती, आजूबाजूची वनराई आणि सह्याद्रीची भौगोलिक रचना हे सर्व मिळून कासचे अस्तित्व तयार करतात.

म्हणून कासचा बहर हा निसर्गाने दिलेला काही दिवसांचा देखावा नसून हजारो वर्षांच्या नैसर्गिक प्रक्रियेने घडवलेली जैवविविधतेची अमूल्य ठेव आहे.

आज सोशल मीडियाच्या माध्यमातून कासचे सौंदर्य जगभर पोहोचत आहे. हे स्वागतार्ह असले तरी प्रसिद्धीबरोबर जबाबदारीही वाढते. कासचा फोटो जगाला दाखवताना कासचे संवर्धन करण्याचा विचारही आपल्या मनात असायला हवा.

**कास बहरलंय चला, ते मनापासून अनुभवूया!**

सह्याद्रीच्या कुशीत पुन्हा एकदा फुलांचा सोहळा रंगतोय. निसर्गाने आपल्या कुंचल्यातून कास पठारावर रंगांची उधळण केली आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून निसर्गप्रेमी या अद्भुत सोहळ्याचा अनुभव घेण्यासाठी कासच्या दिशेने निघाले आहेत.

कास आपल्याला केवळ सौंदर्य देत नाही; ते आपल्याला निसर्गाच्या नाजूकपणाची जाणीव करून देतं.म्हणूनच...

**कास बहरलंय...**
**फुलांनी, रंगांनी आणि निसर्गाच्या अद्भुत सर्जनशीलतेने!**
**चला, हा बहर डोळ्यांत साठवूया**
**पण पुढच्या पिढ्यांसाठी तो जपूनही ठेवूया!**

**दै.अक्षराज : पत्रकार विकास दळवी**
**ठाणे प्रतिनिधी**

## कळले

सर्वपक्ष घेतात पक्ष
युवकमहत्व कळले
सर्वरस्ते आपोआप
झेन झी कडे वळले

वरिष्ठांचीमांदियाळी
म्हातारे भारी चळले
पुढे पुढे करती नीत
जरीहीवयाने छळले

वृध्द अडवती जागा
आपले दळणदळले
दडपूनटाकी तरुणां
सत्ता स्थानी लोळले

असून सुद्धा लायकी
बंधन उगा आवळले
असह्य होतादुस्वास
युवकअंति खवळले

रौद्र रूप दाखवताचं
बाकी त्वरे निवळले
श्वास सगळे मोकळे
वातावरणहीढवळले

सक्षम शिक्षित पिढी
उगाचं त्यास टाळले
तेचं तेचं चेहरे पाहून
लोकसुद्धा कंटाळले

युवका जरा सबुरीने
होऊनका उत्काळले
सोपी नाही वाट नवी
जाल बा ठेचकाळले

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## गरज तातडीच्या 'आर्थिक' मतदीची

पावसाळा संपत आला आहे, अल निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाने बळीराजाच्या संकटात भर टाकली आणि राज्यात दुष्काळाचे सावट दिसु लागले आहे. विदर्भ, मराठवाड्यात पावसाने दडी मारल्याने या भागातील बळीराजा ऊद्ध्वस्त झाला आहे, तुर, सोयाबीन, ईतर कडधान्य याच्या ऊत्पादनावर मोठा विपरीत परिणाम होणार आहे त्याच बरोबर कोकणातील भात पिके धोक्यात आली आहेत. या सगळ्या परिस्थितीमुळे जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा आत्महत्या करत आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथे एका शेतमजूराने आत्महत्या केली त्यापूर्वी हिंगोलीतील एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र काही केल्या थांबत नाही. भरीस भर म्हणून सुपर अल निनोच्या प्रभावाचे भाकित वर्तविण्यात आले आहे आणि दुष्काळाचे संकट अधिकच गंभीर होणार आहे. ऐकिकडे बळीराजा अस्मानी संकटापुढे हतबल झाला आहे तर दुसरीकडे पशुधन कसे जगवायचे, कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा याची विवंचना. हे राज्य शेतकरी हिताचे आहे असे कितीही दावे-प्रतिदावे होत असले तरी सर्व पक्षीय राज्यकर्त्यांनी बळीराजाला गृहित धरूनच आपापले राजकारण आणि सत्ताकारण करत आहेत. पुरोगामी महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या सर्वाधिक आत्महत्या होत आहेत हे महाराष्ट्रातील कटु सत्य आहे. बळीराजाला केवळ कर्जमाफीचे गाजर दाखवले जाते थोडीफार आर्थिक मदत हाती पडते पण परिस्थिती काही केल्या बदलत नाही.

आजच्या घडीला बळीराजाला काही ना काही तातडीने आर्थिक मदत त्याच्यापर्यंत पोहचविण्याची गरज आहे एकरी किमान पंचवीस हजारांची मदत तातडीने केली गेली पाहिजे. पहाणी दौरे, पंचनामे, हे तर होतच राहिल.आढावा बैठका झाल्या मात्र त्या काजु बदाम कोणी खाल्ले यावरूनच गाजल्या. पण तातडीने बळीराजाच्या हातात काही ना काही आर्थिक मदत पडली आहे आणि ती जबाबदारी सरकारने पार पाडायला हवी. २०२४ मधे मते मिळवण्यासाठी तातडीने लाडकी बहिण योजना सुरू करुन पंधराशे रुपये दिले होते त्याच पद्धतीने आता तातडीची आर्थिक मदत झाली पाहिजे. पीक विमा कंपन्या या कधीच शेतकरी हितासाठी काम करत नाहीत तर त्या आपलाच फायदा पहातात आता मात्र अशा संकटात सरकारने पीक विमा कंपन्यांना किमान काही अंशी भरपाई देण्यासाठी बाध्य करावे. अजुनही दुष्काळ जाहीर होत नाही कि प्रत्यक्ष मदत मिळत नाही.आता सरकार खडबडून जागे झाले आहे मुख्यमंत्री आणि त्यांचे सहकारी शेतकऱ्यांच्या बांधावर गेले आहेत, प्रशासन कामाला लागले आहे, जाणते राजे देखील शेतकऱ्यांच्या भेटीला जाणार आहे, हे सगळे स्वागतार्हच आहे मात्र आजच्या घडीला खरी गरज आहे ती शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्षात आर्थिक मदत मिळण्याची. चहूबाजूंनी कोंडी झालेल्या बळीराजाला धीर देणे ही सगळ्यांचीच प्राथमिकता असायला हवी. जगाचा पोशिंदा जगला तरच आपण जगु याचे भान सगळ्यांनी बाळगण्याची गरज आहे.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## संगीत बारीच्या विश्वातील एक तेजस्वी तारा निखळला..

ज्येष्ठ लावणीसम्राज्ञी शकुंतलाबाई नगरकर या महाराष्ट्राच्या लोककला विश्वातील एक दिग्गज आणि प्रसिद्ध लावणी नृत्यांगना होत्या आपल्या आयुष्यातील तब्बल पाच दशकांहून अधिक काळ लावणी कलेलामध्ये योगदान दिले होते लावणीचा प्रवास खऱ्या अर्थाने बहरवणाऱ्या ज्येष्ठ लावणीसम्राज्ञी शकुंतलाताई नगरकर यांचं निधन झाले त्यांचा जन्म १९६० मध्ये अहमदनगर अर्थात अहिल्यानगरच्या एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या आई छबूबाई नगरकर याही त्या काळातील नामांकित लावणी कलावंत. घरातूनच लावणीचा वारसा लाभलेल्या शकुंतलाताईंनी वयाच्या अवघ्या १२व्या वर्षी कलाक्षेत्रात पाऊल ठेवलं १९७४ मध्ये मुंबईतील गिरणगावातील प्रसिद्ध लालबागच्या 'हनुमान थिएटर'मध्ये त्यांच्या लावणीचा प्रवास खऱ्या अर्थाने बहरला.

अनेक दशकं त्यांनी आपल्या भारदस्त आवाजानं आणि अदाकारीनं रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं.'संगीत बारी' नाट्यप्रयोगातून त्यांनी आधुनिक शहरी प्रेक्षकांसमोर बैठकीच्या लावणीची परंपरा मांडली.'लावणी के रंग' आणि 'लव्ह अँड लावणी' यांसारखे आधुनिक प्रयोगही केले. पण, त्यात त्यांनी लावणीचा पारंपरिक बाज मात्र कायम राखला. लोककलेला त्यांनी आपलं अवघं आयुष्य वाहून घेतलेलं. त्यांच्या या अमूल्य योगदानाची दखल घेत शासनानं आणि विविध संस्थांकडून त्यांना गौरवण्यात आलेलं. शकुंतलाताई नगरकर यांचा 'शाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार', २०१८ मध्ये 'मुंबई महापौर पुरस्कार' आणि २०२३ मध्ये 'नाट्य गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले होते त्यांच्या निधनानं संगीत बारीच्या विश्वातील एक तेजस्वी तारा निखळला असून संपूर्ण लोककला क्षेत्रावर शोककळा पसरली असून सांस्कृतिक आणि लोककला क्षेत्राची अपरिहार्य हानी झाली आहे.

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात बातम्या

## गुडसूर येथील जय भवानी गणेश मंडळ पिजार गल्ली उत्साहात विसर्जन



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२३, उदगीर (लातूर) :** गुडसूर येथे जय भवानी गणेश मंडळाच्या वतीने गणरायाला भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. ढोल-ताशांच्या गजरात आणि गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात गणेश विसर्जनाची मिरवणूक उत्साहात पार पडली.

यावेळी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणुकीदरम्यान युवकांचा उत्साह विशेष आकर्षण ठरला. शांतता व शिस्तीचे पालन करत गणरायाचे विसर्जन करण्यात आले. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## मुंबईत राष्ट्रीय ISSO तायक्कांदो स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद देशभरातील युवा खेळाडूंचा सहभाग

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, मुंबई :** शालेय स्तरावरील क्रीडा प्रतिभेला राष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देणाऱ्या खडडज राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेचे आयोजन मुंबईतील धीरुभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूल (DAIS) आणि नीता मुकेश अंबानी ज्युनियर स्कूल (छचअगड) येथे करण्यात आले आहे.

१८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत देशभरातील १४५ आंतरराष्ट्रीय शाळांमधील १,००० हून अधिक विद्यार्थी-खेळाडू सहभागी होत आहेत. फुटबॉल, ज्युडो आणि तायक्कांदो या खेळांचा स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे.

तायक्कांदो स्पर्धेत विविध वयोगटातील मुला-मुलींना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळत आहे. ११ वर्षांखालील, १४ वर्षांखालील आणि १७ वर्षांखालील मुला-मुलींसाठी क्योरुगी प्रकारातील विविध वजनगटांमध्ये सामने घेण्यात येत आहेत. मुंबईतील तायक्कांदो स्पर्धा १८ ते २० सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेचे महत्त्व केवळ पदकांपुरते मर्यादित नसून, गुणवंत शालेय खेळाडूंना पुढील स्तरावरील स्पर्धांसाठी संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही ते महत्त्वाचे आहे. ISSO स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना School Games Federation of India (SGFI) तसेच International School Sport Federation (ISF) स्तरावरील स्पर्धांसाठी पुढे जाण्याची संधी मिळू शकते.

स्पर्धेत विविध खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. Glendale Academyच्या रिया विनीत गोयलने मुलींच्या १०-११ वर्षे क्योरुगी विभागातील २०.१-२२ किलो वजनगटात सुवर्णपदक पटकावले. तिने उपांत्यपूर्व फेरी, उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीत २-० अशा विजयासह स्पर्धेत अपराजित कामगिरी केली.

दरम्यान, नवी मुंबईमध्येही शालेय क्रीडा स्पर्धांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळत आहे. नवी मुंबई महानगरपालिका, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र आणि ठाणे जिल्हा क्रीडा परिषद यांच्या सहकार्याने २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांना सुरुवात झाली आहे. या स्पर्धांमध्ये नवी मुंबईतील २५० हून अधिक शाळांमधील ४० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई परिसरात शालेय क्रीडा स्पर्धांचा वाढता विस्तार युवा खेळाडूंसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. स्थानिक, जिल्हा आणि राज्यस्तरीय स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना अनुभव मिळत असून, त्यातून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्यासाठी आवश्यक स्पर्धात्मक वातावरण निर्माण होत आहे.

तायक्कांदोच्या दृष्टीने पाहता, अशा राष्ट्रीय शालेय स्पर्धांमुळे प्रशिक्षकांना नवोदित खेळाडूंची गुणवत्ता ओळखण्याची, विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या स्पर्धेचा अनुभव देण्याची आणि भविष्यातील स्पर्धांसाठी त्यांची तयारी करण्याची संधी मिळत आहे.

मुंबई महानगर प्रदेशातील नवी मुंबई, ठाणे आणि मुंबई या भागांमध्ये तायक्कांदो आणि इतर क्रीडा प्रकारांना मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता, आगामी काळात शालेय स्तरातून राष्ट्रीय स्तरावरील अधिक खेळाडू घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल; सतीश कांबळे यांना जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२३, पालम (परभणी) :** पालम येथील पीएम श्री जिल्हा परिषद केंद्रीय कन्या प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सतीश कांबळे यांच्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना यावर्षीचा जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शैक्षणिक गुणवत्तावाढ तसेच शाळेच्या प्रगतीसाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

जिल्हा परिषद परभणीच्या वतीने २१ सप्टेंबर रोजी अक्षदा मंगल कार्यालय, परभणी येथे आदर्श शिक्षक पुरस्कार, गुणवंत विद्यार्थी सत्कार व आदर्श शाळा पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना बोर्डीकर, जिल्हा परिषद अध्यक्षा लताताई वाकळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांच्या हस्ते सतीश कांबळे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना कांबळे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावरही विशेष भर दिला. शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे शाळेच्या शैक्षणिक वातावरणाला चालना मिळाली असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीही विविध उपक्रमांना प्रोत्साहन मिळाले आहे.

शैक्षणिक कार्यासोबतच कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या माध्यमातून शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी प्रशासकीय स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्याचे कामही कांबळे यांनी केले. शिक्षकांच्या समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून त्या सोडविण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचीही दखल घेण्यात आली.

शिक्षण क्षेत्रातील योगदान, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी केलेले प्रयत्न आणि शिक्षकांच्या प्रश्नांसाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत जिल्हा परिषदेच्या वतीने त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे पालमच्या शैक्षणिक क्षेत्रात समाधान व्यक्त होत असून, सर्व स्तरातील मान्यवराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## चंद्रपुरात कृषी महोत्सव व राज्यस्तरीय वर-वधू परिचय मेळाव्याचे आयोजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** केंद्रीय समिती पुरस्कृत धनोजे कुणबी समाज मंदिर, लक्ष्मीनगर, चंद्रपूर यांच्या वतीने कृषी महोत्सव व राज्यस्तरीय वर-वधू परिचय मेळावा २०२६-२७ चे आयोजन करण्यात आले आहे. हा तीन दिवसीय मेळावा दि. ८, ९ व १० जानेवारी २०२७ रोजी चांदा क्लब ग्राउंड, चंद्रपूर येथे होणार आहे. मेळाव्याचे अध्यक्ष श्रीधर मालेकर असून, समाजबांधवांसह शेतकरी, युवक-युवती आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान, आधुनिक शेती पद्धती आणि शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवात शेतीविषयक विविध तंत्रज्ञान, कृषी अवजारे, शेतीसाठी उपयुक्त साहित्य, खाद्यपदार्थ, धान्य, कापड आदींचे विविध स्टॉल उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकरी व नागरिकांना विविध उत्पादनांची माहिती आणि प्रत्यक्ष पाहणी करण्याची संधी मिळणार आहे.

मेळाव्याच्या निमित्ताने उद्योजकता मार्गदर्शन शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर आणि ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. युवक-युवतींना उद्योग व व्यवसायाच्या संधींबाबत मार्गदर्शन मिळावे, तसेच समाजातील ज्येष्ठांचा सन्मान व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

राज्यस्तरीय वर-वधू परिचय मेळावा हा या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण राहणार आहे. उपवर-वधू नोंदणी डीकेचांदाडॉटइन ही वेबसाईट सुरू झाली आहे. विवाह इच्छुक युवक-



युवती व त्यांच्या पालकांना परस्पर परिचयातून योग्य स्थळ निवडण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.

मेळाव्याच्या तिन्ही दिवसांत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजन समिती, निधी संकलन समिती, संपादकीय समिती, जाहिरात समिती आणि प्रसिद्धी समिती अशा विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे.

कृषी, उद्योजकता, आरोग्य, सामाजिक बांधिलकी, विवाह जुळवणी आणि सांस्कृतिक परंपरा यांचा सुंदर संगम घडविणारा हा महोत्सव समाजासाठी उपयुक्त ठरणार असून, चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक धनोजे कुणबी समाज मंदिर लक्ष्मीनगर कार्यकारिणीच्या वतीने करण्यात आले आहे.

## वडगाव शेरीत सोसायटीच्या अंतर्गत रस्त्यावर PMC ची रात्रीची कारवाई

**अक्षराज : भुषण बावचीकर**

**दि.२२, पुणे :** वडगाव शेरी येथील वीणा सहकारी गृहरचना संस्था मर्यादितच्या अंतर्गत रस्त्याच्या वापरावरून सुरू असलेल्या वादाला आता राजकीय आणि प्रशासकीय हस्तक्षेपाचे स्वरूप प्राप्त झाल्याचा आरोप संस्थेने केला आहे. दिनांक १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ७.३० वाजता पुणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचे अधिकारी भूषण कोकाटे व वालगुडे हे JCB आणि पोलीस बंदोबस्तासह संस्थेच्या ठिकाणी दाखल झाले. विशेष म्हणजे, संस्थेला कोणतीही पूर्वसूचना अथवा नोटीस न देता ही कारवाई करण्यात आल्याचा आरोप संस्थेने केला आहे.

संस्थेच्या म्हणण्यानुसार, सदर वाद हा बाहेरील व्यक्तींकडून संस्थेच्या अंतर्गत रस्त्याचा वापर, मालकी व Right of Way यासंदर्भातील दिवाणी स्वरूपाचा वाद आहे. याप्रकरणी न्यायालयीन प्रकरणाचा इतिहास असून संस्थेने उपलब्ध न्यायालयीन कागदपत्रे, लेआउट, रस्त्याशी संबंधित कागदपत्रे आणि संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेचा ठराव यासह सर्व संबंधित कागदपत्रे जतन केली आहेत.

**२५ ऑगस्टचा ठराव, ७ सप्टेंबरला संरक्षक व्यवस्था**

संस्थेने सांगितले की, २५ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या अंतर्गत रस्त्याच्या संरक्षणासाठी एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. त्यानुसार ७ सप्टेंबर रोजी रस्त्याच्या टोकाला संरक्षक व्यवस्था उभारण्यात आली. त्यावेळी पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणीही केली होती.

या पार्श्वभूमीवर १७ सप्टेंबर रोजी अचानक PMC चे अतिक्रमण विभागाचे पथक JCB व पोलीस बंदोबस्तासह दाखल झाल्याने संस्थेच्या सभासदांनी तीव्र आक्षेप घेतला.

**सर्व कागदपत्रे दाखवूनही कारवाईचा आग्रह**

घटनास्थळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी लेआउट,



रस्त्याशी संबंधित कागदपत्रे, विशेष सर्वसाधारण सभेचा ठराव आणि उपलब्ध न्यायालयीन कागदपत्रे अधिकाऱ्यांसमोर सादर केली. सदर विषय हा थेट अतिक्रमणाचा नसून मालकी आणि रस्ता वापराच्या अधिकाराशी संबंधित दिवाणी स्वरूपाचा वाद असल्याचे संस्थेने स्पष्ट केले.

मात्र, संस्थेच्या म्हणण्यानुसार, संबंधित अधिकारी भूषण कोकाटे व वालगुडे यांनी कारवाईची भूमिका कायम ठेवली. संस्थेने तीव्र कायदेशीर आक्षेप नोंदवल्यानंतर अखेर त्या रात्रीची कारवाई स्थगित करण्यात आली.

**राजकीय दबावातून प्रशासकीय यंत्रणेचा वापर?**

या संपूर्ण घटनाक्रमाच्या पार्श्वभूमीवर संस्थेने स्थानिक राजकीय दबावामुळे प्रशासकीय यंत्रणेचा वापर केला जात असल्याचा गंभीर संशय व्यक्त केला आहे. संस्थेने यापूर्वीही पोलीस प्रशासनाच्या भूमिकेबाबत मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्याकडे स्वतंत्र तक्रार सादर केली आहे.

संस्थेच्या म्हणण्यानुसार, यापूर्वीही संरक्षक व्यवस्था काढा, अन्यथा FIR करण्यात येईल अशा स्वरूपाचा दबाव आणण्यात आला होता. त्यानंतर पोलीस आयुक्त कार्यालयाकडे याबाबत तक्रार करण्यात आली होती.

आता त्याच प्रकरणात झचउच्या अतिक्रमण विभागाने कोणतीही पूर्वसूचना न देता रात्रीच्या वेळी JCB व पोलीस बंदोबस्तासह कारवाईचा प्रयत्न केल्याने, हा योगायोग आहे की बाह्य दबावाचा परिणाम, याची चौकशी करण्याची मागणी संस्थेने केली आहे.

**महापालिका आयुक्तांकडे चौकशीची मागणी**

वीणा सहकारी गृहरचना संस्थेने पुणे महानगरपालिका आयुक्त, शहर अभियंता तसेच अतिक्रमण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचा निर्णय घेतला आहे. दिनांक १७ सप्टेंबर रोजी झालेल्या कारवाईच्या प्रयत्नामागील तक्रार, आदेश, फाईल नोटिंग, पाहणी अहवाल, मोजणी/सीमांकन अहवाल आणि कारवाईचा कायदेशीर आधार संस्थेला उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात येणार आहे.

तसेच दिवाणी स्वरूपाच्या वादात कोणतीही एकतर्फी कारवाई न करता संबंधित पक्षांना नोटीस देऊन त्यांची कागदपत्रे तपासावीत आणि सक्षम न्यायालय अथवा प्राधिकरणाच्या आदेशानुसारच पुढील कार्यवाही करावी, अशी मागणी संस्थेने केली आहे.

**कायदेशीर आदेशाचे पालन करू; मात्र दबावाखाली कारवाई नको**

संस्था कायद्याचा पूर्ण आदर करते. सक्षम न्यायालय किंवा प्राधिकरणाचा वैध आदेश असल्यास त्याचे पालन करण्यास आम्ही तयार आहोत. मात्र, कोणतीही नोटीस न देता रात्रीच्या वेळी JCB आणि पोलीस बंदोबस्तासह येऊन कारवाई करण्याचा प्रयत्न होणे गंभीर आहे. संस्थेने सर्व कागदपत्रे उपलब्ध करून दिल्यानंतरही अशी कारवाई करण्याचा प्रयत्न का झाला, याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. राजकीय अथवा बाह्य दबावाखाली प्रशासनाने कोणत्याही एका पक्षाच्या बाजूने कारवाई करू नये, अशी भूमिका संस्थेने व्यक्त केली आहे.

दरम्यान, पुणे महापालिका अतिक्रमण विभागाकडून या विशिष्ट घटनेबाबत अधिकृत स्पष्टीकरण उपलब्ध झालेले नाही.

## मुंबई-वडोदरा एक्स्प्रेस-वे भूसंपादनात मोबदला न मिळाल्याचा आदिवासी शेतकऱ्याचा आरोप

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२३, तलासरी :** मुंबई-वडोदरा एक्स्प्रेस-वेच्या भूसंपादन प्रक्रियेत आदिवासी शेतकऱ्याला योग्य मोबदला मिळाला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तलासरी तालुक्यातील बोबापाडा येथील आदिवासी शेतकरी शंकर लहाण्या घोडा यांनी याबाबत संबंधित प्रशासनाकडे तक्रार केली असून, पंचनामा व विवरणपत्रामध्ये जमीन, घर तसेच झाडांच्या नोंदी चुकीच्या पद्धतीने करण्यात आल्याने आपले आर्थिक नुकसान झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. मुंबई-वडोदरा एक्स्प्रेस-वेचे काम तलासरीपर्यंत पूर्ण झाले आहे. मात्र, भूसंपादन प्रक्रियेला पाच ते सहा वर्षे उलटूनही प्रशासकीय स्तरावरील चुकीच्या नोंदी व प्रक्रियेमुळे आपण जमीन भूसंपादनाच्या योग्य मोबदल्यापासून वंचित असल्याचे शंकर घोडा यांनी तक्रारीत म्हटले आहे.

शंकर घोडा यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या जागेचा पंचनामा करताना तयार करण्यात आलेल्या विवरणपत्रात त्यांचे नाव, घर तसेच झाडांच्या नोंदी योग्य पद्धतीने करण्यात




आलेल्या नाहीत. त्यामुळे भूसंपादनाच्या वेळी प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या मालमत्तेच्या तुलनेत कमी अथवा अपूर्ण नोंद झाल्याने त्यांना अपेक्षित मोबदला मिळालेला नसल्याचा त्यांचा आरोप आहे. याप्रकरणी त्यांनी सक्षम प्राधिकारी, भूमी अभिलेख विभाग तसेच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज सादर केला आहे. फेरमोजणी करून प्रत्यक्ष जागेवरील जमीन, घर व झाडांची नोंद तपासावी आणि त्यानुसार मोबदला निश्चित करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. या प्रकरणाची तक्रार नितेश भेलका, महाराष्ट्र नवनिर्माण सेना तालुका सचिव तथा रस्ते, साधन-सुविधा आस्थापना तालुका अध्यक्ष यांच्याकडेही करण्यात आली आहे. मनसे पदाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी आणि संबंधित आदिवासी शेतकऱ्याला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली आहे.भूसंपादन प्रक्रियेत झालेल्या नोंदींची फेरतपासणी करून प्रत्यक्ष जागेची मोजणी करावी. पंचनामा, विवरणपत्र आणि उपलब्ध प्रशासकीय नोंदी यांची पडताळणी करून जमीन, घर व झाडांचा योग्य मोबदला निश्चित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

संबंधित आदिवासी शेतकऱ्यांना त्यांचा योग्य मोबदला तातडीने मिळाला नाही, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसे पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.दरम्यान, फेरमोजणीचा अहवाल तातडीने जाहीर करून भूसंपादन प्रक्रियेत प्रत्यक्ष स्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी शंकर घोडा यांनी केली आहे. प्रशासनाकडून या तक्रारीची चौकशी करून नोंदी दुरुस्त केल्या जातात का आणि संबंधित शेतकऱ्याला अतिरिक्त अथवा योग्य मोबदला मिळतो का, याकडे तलासरी तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## ऐरोली सेक्टर ३ मधील चौधरी कुटुंबियांच्या घरच्या गणपतीने वेधले लक्ष

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२३, ऐरोली (ठाणे) :** ऐरोली येथील सेक्टर ३ मधील श्रीराम हायस्कूल जवळ जे-१८३ येथे राहणाऱ्या चौधरी कुटुंबियांच्या घरी विराजमान झालेल्या गणपती बाप्पाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. हा गणपती अनंत चतुर्थी पर्यंत विराजमान असणार आहे.

यंदा चौधरी कुटुंबियांनी साकारलेला घरगुती देखावा अतिशय



सुंदर आणि आकर्षक असून बाळ गणेशाची मूर्ती अत्यंत मनमोहक आहे. देखाव्याची सुंदरता आणि मूर्तीचे आकर्षक रूप यामुळे ही बातमी सध्या सोशल मीडियावर प्रचंड वायरल होत आहे.

या वायरल गणपतीचे दर्शन घेण्यासाठी नवी मुंबईसह ठाणे आणि पालघर जिल्ह्यातून मोठ्या संख्येने भाविक येत आहेत. घरगुती गणपती असून देखील दर्शनासाठी सुमारे २० ते २५ मिनिटांचा कालावधी लागत आहे, तरीही भाविक मोठ्या श्रद्धेने आणि शांततेत रांगेत उभे राहून बाप्पाचे दर्शन घेत आहेत.

या आकर्षक सजावटीचे संपूर्ण श्रेय निखिल चौधरी आणि स्वप्निल चौधरी या दोन्ही भावंडांना जाते. दोघांनी मिळून अतिशय मेहनतीने आणि कल्पकतेने हा देखावा साकारला आहे.

**स्थळ :** आम्ही चौधरी निवास, जे-१८३, सेक्टर ३, श्रीराम हायस्कूल जवळ, ऐरोली, नवी मुंबई.

